महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव (आस्थापना शाखा)

मेन रोड, धाराशिव, पिनकोड -413501 Email दुरध्वनी क्र 02472-225618

जा.क्र.2022/महसूल/तलाठी भरती/आस्था 5/सीआर-22

दि.29.01.2024

प्रति,

विषय- तलाठी भरती प्रक्रीया 2022
मुळ कागदपत्रे पडताळणी/तपासणीसाठी उपस्थित रहाणेबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, धाराशिव जिल्हा महसूल आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी टीसीएस कंपनी मार्फत दि.17 ऑगस्ट 2023 ते 14 सप्टेंबर 2023 या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात आली असुन सदर परीक्षेतील प्राप्त गुणांनुसार प्रवर्गनिहाय/समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड व तात्पुरती प्रतिक्षा यादी शासन स्तरावरुन व या कार्यालयाचे संकेतस्थळावर www.osmanabad.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख, पुणे यांनी टी सी एस कंपनी मार्फत अंतिम निवड यादीतील उमेदवारांच्या बुबळांच्या आधारे तसेच चेहरा ओळखपणालीचा वापर करुन बायोमेट्रीक व्दारे व हाताच्या ठश्यांची तपासणी करणेसाठी दि.06.02.2024 रोजी धाराशिव जिल्हयात येणार आहेत.

त्यानुषंगाने धाराशिव जिल्हयातील तलाठी भरती-2022 च्या अंतिम निवड यादीतील सर्व उमेदवारानी त्यांची बुबळांच्या आधारे तसेच चेहरा ओळखप्रणालीचा वापर करुन बायोमेट्रीक व्दारे व हाताच्या ठश्यांची तपासणीकामी दि 06.02.2024 रोजी सकाळी 10.00 वाजता जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, धाराशिव येथे उपस्थित रहावे.

तसेच अंतिम निवड यादीतील उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणीसाठी दि 07.02.2024 ते दि.08.02.2024 रोजी सकाळी 10.00 ते सायं.05.00 या वेळेत जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे करण्यात येणार आहे. तेव्हा सदर अंतिम निवड यादीत आपले नावाचा समावेश असल्यामुळे आपण खालीलप्रमाणे मुळ आवश्यक कागदपत्रांसह व त्यांचे सांक्षाकीत छायांपतीच्या दोन संचासह तसेच जाहिरातीत नमुद पात्रतेच्या संदर्भात अनुषंगीक कादपत्रांसह जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे वेळेवर उपस्थित रहावे.

1. उमेदवाराचे ओळखपत्र (मतदान कार्ड/आधार कार्ड/पॅनकार्ड/ड्रायव्हींग लायसन्स इत्यादी.)
2. पासपोर्ट साईज 02 फोटो
3. शैक्षणिक कागदपत्रे
4. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
5. जन्म तारखेचे प्रमाणपत्र (वयाचा पुरावा)
6. जात प्रमाणपत्र (लागु असल्यास)
7. जात वैधता प्रमाणपत्र (लागु असल्यास)
8. नॉन क्रिमीलीअर प्रमाणपत्र (लागु असल्यास)
9. माजी सैनिक असल्याचा पुरावा (लागु असल्यास)

D:\OFFICE WORK\TSES\Talathi Bharti 2019\तलाठी भरती सेवा ...

Scanned with CamScanner

10. दिव्यांग/अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र (लागु असल्यास)

11. आर्थिकदृष्टया दुर्बल घटक असल्याबाबतचे पात्रता प्रमाणपत्र (लागु असल्यास)

उक्त दिवशी मुळ आवश्यक कागदपत्रासह व त्यांचे साक्षांकीत छायाप्रतीच्या दोन संचासह तसेच जाहिरातीत नमुद पात्रते संदर्भात अनुषंगीक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्रे पडताळणीस अनुपस्थित राहिल्यास आपणास शासकीय नौकरी स्वारस्य नाही. असे गृहीत धरुन आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- 29.01.2024.

ठिकाण :- धाराशिव.

29/01/2024

सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती,

तथा निवासी उपजिल्हाधिकारी, धाराशिव.

Scanned with CamScanner